स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**EXAMINATION SECTION**

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com

जा.क्र :स्वारातीमविनां/ब.शि.वि/२०२३–२४/३८२ दि. ३०/०४/२०२४

**प्रति, सर्व संलग्नीत शिक्षण/शारिरीक शिक्षण व विधी/ बहिस्थ अभ्यासकेंद्र**
**प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड**

**विषय** : दिनांक ०३/०५/२०२४ पासून चालू होत असलेल्या नियमित व बहिस्थ परीक्षा नियोजित वेळेतच होत असलेबाबत तसेच वंचित राहणा–या बहिस्थ विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा घेणे बाबत..

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व संबधित व विद्यार्थ्यांस कळविण्यात येते की, दिनांक ०३/०५/२०२४ ते ३१/०५/२०२४ या दरम्यान प्रस्तुत विद्यापीठाच्याच नियमित व विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे चालू आहेत. याच दरम्यान बहिस्थ एम.ए. व एम.कॉम. अभ्यासक्रमाच्या ही परीक्षाचे नियोजन विद्यापीठाने केलेले आहे. सदर नियमित व बहिस्थ अशा दोन्ही अभ्यासक्रमासाठी काही विद्यार्थी प्रवेशित असून त्याच्या दोन्ही अभ्यासक्रमाच्या परीक्षा एकाच दिवशी व एकाचवेळी येत असल्याबाबत मा. प्राचार्य व संबधित विद्यार्थी यांनी निवेदनाव्दारे मा. कुलगुरू महोदय यांचेकडे विनंती करून सदर परीक्षाच्या दिनांक व वेळेमध्ये बदल करण्यासाठी मागणी केली होती.

सबब उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने मा. कुलगुरूच्या आदेशान्वये सर्व संबधितांस व परीक्षार्थी यांना कळविण्यात येते की, दिनांक ०३/०५/२०२४ रोजी पासून नियमित बी.एड्, एम.एड्. बीपी.एड्. एमपि. एड., लॉ इत्यादी अभ्यासक्रमासोबत बहिस्थ एम.ए./एम.कॉम. अभ्यासक्रमाच्याही परीक्षा देण्या–या ज्या ज्या विद्यार्थ्याचे एकाच दिवशी व एकाच वेळी येणारे पेपरची परीक्षा बाबतची माहिती आपल्या नियमित प्रवेश असणा–या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामार्फत दोन्ही (हॉलटिकीट) प्रवेशपत्रासह अर्ज बहिस्थ शिक्षण विभागाकडे त्वरीत पाठवावा सदरील विद्यार्थ्यांने नियमित अभ्यासक्रमाची ( बी.एड्, एम.एड्. बीपी. एड्. एमपि.एड., लॉ इत्यादी) परीक्षा देणे गरजेचे/आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांचे बहिस्थ अभ्यासक्रमाची एम.ए./एम.कॉम. विशेष परीक्षा त्यांची नियमित अभ्यासक्रमाची परीक्षा संपल्यानंतर घेण्यात येणार आहेत. त्यामुळे कोणताही विद्यार्थी कोणत्याही परीक्षेपासून वंचित राहणार नाही यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

वंचित राहणा–या विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था केलेली असल्यामुळे दिनांक ०३/०५/२०२४ पासून प्रारंभ होणा–या कोणत्याही परीक्षा नियमित/बहिस्थ पुढे ढकललेल्या नाहीत यांची नोंद सर्व विद्यार्थी व सर्व संबंधीतांनी घ्यावी. विशेषबाब म्हणून परीक्षेपासून वंचित राहणा–या बहिस्थ अभ्याक्रमाच्याच विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. इतर नियमित कोणत्याही अभ्यासक्रमाच्या परीक्षा पुन्हा होणार नाहीत यांची नोंद घेण्यात यावी. बहिस्थ अभ्यासक्रमाच्या एम.ए./एम.कॉम. च्या वंचित विद्यार्थ्याची माहिती दि.१३/०५/२०२४ पर्यंत आपल्या महाविद्यालयामार्फत बहिस्थ शिक्षण विभागाकडे पोहचतील असे (दोन्ही हॉलटिकीटची सत्यप्रतीसह) पाठवण्यात यावेत. ज्या वंचित राहणा–या बहिस्थ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त होतील त्यांचीच विशेष परीक्षा पुन्हा घेतली जाईल यांची नोंद संबंधितांनी घावी.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :– १.मा.कुलगुरू महोदय, यांचे कार्यलय, प्रस्तुत विद्यापीठ,
२.मा. संचालक, बहिस्थ शिक्षण विभाग,
३.मा. उपकुलसचिव,/ कक्षप्रमुख परीक्षा विभाग